**"नोव्हेंबर २०२०" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

## (क) शासन निर्णय / अधिसूचना

- दिनांक २ नोव्हेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेला सन २०२०-२१ करिता अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन खर्चासाठी ३६-सहायक अनुदान (वेतन) या उद्दिष्टाखाली रु. २५.०० लाख इतके (तिसरा हप्ता) अनुदान वितरित करण्यात आले आहे.
- दिनांक ३ नोव्हेंबर २०२० च्या परिपत्रकान्वये "कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०१९" चा १८३ उमेदवारांचा निकाल जाहिर करण्यात आला आहे.
- दिनांक ५ नोव्हेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर संस्थेस ३१-सहायक अनुदाने (अनिवार्य), ३६-सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली रु.५२.३४ लाख इतके अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक ६ नोव्हेंबर २०२० च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ (सीपीटीपी-२) अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या परिविक्षिाधीन ७ उपजिल्हाधिकारी, गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.
- दिनांक ९ नोव्हेंबर २०२० च्या शासन पत्रान्वये केंद्र शासनाने हयातीचा दाखला (Extension of Period for submission of Life Certificate from October 2020 till December 2020) सादर करण्याचे कार्यालयीन ज्ञापन निर्गमित केले आहे.
- दिनांक ९ नोव्हेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर संस्थेस ३१-सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.३,५४,७००/- इतके अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १३ नोव्हेंबर २०२० च्या कार्यालयीन आदेशन्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-१ (सीपीटीपी-१) अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या ८ सहायक विक्रीकर आयुक्त (सहायक राज्यकर आयुक्त), गट-अ यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यत आला आहे.
- दिनांक १७ नोव्हेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सन २०२०-२१ करिता वनामती, नागपूर संस्थेस माहे नोव्हेंबर २०२० करिता ३६-सहायक अनुदाने (वेतन) या उद्दिष्टाखाली रु.३,५४,७००/- इतके अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १७ नोव्हेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये नव्याने निर्माण केलेला राज्य निवडणूक विभाग रद्द करण्यात आला असून, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयासाठी निर्माण करण्यात आलेली १२८ पदांची पदनिर्मिती कायम ठेवण्यात आली आहे.
- दिनांक १९ नोव्हेंबर २०२० च्या शासन शुद्धीपत्रकान्वये क्रिष्णा मोटर्स, जोगेश्वरी, मुंबई या संस्थेस ४ वाहनचालक कंत्राटी पद्धतीने पुरविण्यासाठी दिनांक १२ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येऊन, सेवा करार दिनांक १ ऑक्टोबर २०२० ते ३० नोव्हेंबर २०२१ या एक वर्ष कालावधीसाठी करण्यात आला होता. आता त्याऐवजी दिनांक १ ऑक्टोबर २०२० ते ३० सप्टेंबर २०२१ असा एक वर्ष सेवा करार अशी सुधारणा करण्यात आली आहे
- दिनांक २५ नोव्हेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) मधील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी ५ All in One PC संगणक खरेदीसाठी रु.२,२९,०६०/- इतक्या झालेल्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक २४ नोव्हेंबर २०२० च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर (उत्तर), पैठण, औरंगाबाद या संस्थेला सन २०२०-२१ करिता अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतन खर्चासाठी ३६-सहायक अनुदान (वेतन) या उद्दिष्टाखाली रु. २०.०० लाख इतके (अंतिम हप्ता) अनुदान मंजूर करण्यात आले आहेत.

**(ख) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त</u>**

- भारतीय प्रशासन सेवेतील १६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-२, वरिष्ठ स्वीय सहायक-१ अशा ४ कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- एका निम्नश्रेणी लघुलेखकाची बदली रद्द करण्यात आली आहे.
- तीन कक्ष अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यात आला आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याला कार्यमुक्त करण्यात आले आहे.

**(ग) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- एका लिपिक-टंकलेखकाची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.
- अवर सचिव-१, कक्ष अधिकारी-६ अशा ७ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एका कक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

*****